काशी शिक्षण संस्था, केळकरवाडी ता.जि. वर्धा संचालित संजय गांधी हायस्कूल, केळकरवाडी, ता.जि.वर्धा या शाळेचे रहेबर सेवाभावी संस्था, परभणी (अल्पसंख्याक) या संस्थेस व्यवस्थापन हस्तांतर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः माशाह-३१२६/प्र.क्र.३६२ /२६/एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ४ ऑगस्ट, २०२६

<u>वाचा</u> : १) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक माशाह २०११/(२१०/११)/माशि-३, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२.

२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-११२६/प्र.क्र.२६०/एस.एम-१, दिनांक १५ जुलै, २०२६.

<u>संदर्भ</u> : विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र.शिउसंना/माध्य-क/ हस्तांतरण/ २२३८४५६/२०२५, दि.१६.०३.२०२६.

<u>प्रस्तावना :</u>

काशी शिक्षण संस्था, केळकरवाडी, ता.जि. वर्धा संचालित संजय गांधी हायस्कूल, केळकरवाडी, ता.जि.वर्धा या मराठी माध्यमाच्या अनुदानित माध्यमिक (इ.५ वी ते १० वी) या शाळेचे रहेबर सेवाभावी संस्था, परभणी (अल्पसंख्याक) या संस्थेस व्यवस्थापन हस्तांतर करण्याबाबचा संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

काशी शिक्षण संस्था, केळकरवाडी ता.जि. वर्धा संचालित संजय गांधी हायस्कूल, केळकरवाडी, ता.जि.वर्धा या मराठी माध्यमाच्या अनुदानित माध्यमिक (इ.५ वी ते १० वी) या शाळेचे रहेबर सेवाभावी संस्था, परभणी (अल्पसंख्याक) या संस्थेस व्यवस्थापन हस्तांतर करण्यास खाली नमूद अटी व शर्तीवर मान्यता देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे :-

(१) व्यवस्थापन बदल झालेल्या शाळेची किमान पटसंख्येची अट कोणत्याही कारणास्तव शिथिल केली जाणार नाही.
(२) व्यवस्थापन बदल झालेल्या शाळेच्या बाबतीत शासन परवानगीच्या/मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाहीत याची खबरदारी घेण्यात यावी.
(३) शासनाकडून शाळा, शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/वेतनेत्तर अनुदान, विद्यार्थी इ. बाबत वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ. चे पालन करणे नवीन संस्थेस बंधनकारक राहील.
(४) सदर व्यवस्थापन बदल, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक: माशाह २०११/(२१०/११) माशि-३, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२ मध्ये विहित केलेल्या नियमानुसार व कार्यपद्धतीनुसार अंमलात येईल.
(५) दि.१५.०७.२०२६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार “ज्यावेळी एखाद्या बिगर अल्पसंख्यांक शाळेचे अथवा शैक्षणिक संस्थेचे व्यवस्थापन अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेकडे हस्तांतरीत केले जाते, त्यावेळी हस्तांतरीत होणाऱ्या

शाळेच्या अथवा शैक्षणिक संस्थेच्या बिगर अल्पसंख्यांक दर्जात कोणताही बदल होणार नाही. व्यवस्थापन हस्तांतरणानंतरही सदर शाळा अथवा शैक्षणिक संस्था बिगर अल्पसंख्यांकच राहत असल्याने या शाळेस अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांना असलेले संरक्षण प्राप्त होणार नाही. हस्तांतरणापूर्वी सदर शाळेस असलेला बिगर अल्पसंख्यांक दर्जा हस्तांतरणानंतरही कायम असेल." त्यामुळे हस्तांतरीत होणाऱ्या संजय गांधी हायस्कूल, केळकरवाडी, ता.जि.वर्धा या मराठी माध्यमाच्या शाळेचा बिगर अल्पसंख्यांक दर्जा हस्तांतरणानंतरही कायम राहील.

(६) सदर व्यवस्थापन बदलासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे नव्याने तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा व्यवस्थापन बदला संदर्भातील अटी व शर्तीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास किंवा व्यवस्थापन बदलापूर्वीच्या संस्थेतील कार्यरत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तींचा नवीन संस्थेद्वारा भंग झाल्यास, हस्तांतर रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी सर्व बाबी तपासून व वरील अटी/शर्ती सोबतच अन्य आवश्यक अटींचा समावेश करून, शाळेचे व्यवस्थापन बदलाबाबत पुढील कार्यवाही १५ दिवसांत करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०४१७०८२५८९४९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHARAD SHRIPATRAO MAKNE

Digitally signed by SHARAD SHRIPATRAO MAKNE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=40009B0C8C256BDD08326D4D03BC30FB4DE2ADCC1F32BBB9E402266A2B8F7A5A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1B4D811632BD3D04BCA0618EEF09D95DD93FF5D37934DF32703629ABD10E555A, cn=SHARAD SHRIPATRAO MAKNE
Date: 2026.08.04 17:09:22 +05'30'

(शरद माकणे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर.

३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, वर्धा.

४) अध्यक्ष/ सचिव, काशी शिक्षण संस्था, केळकरवाडी, ता.जि. वर्धा.

५) अध्यक्ष/ सचिव, रहेबर सेवाभावी संस्था, परभणी (अल्पसंख्याक).

६) निवडनस्ती (एसएम-१)